N T

मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./469/२००८

परिपत्रक

प्राचार्य / संचालक कला, संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, व तत्सम महाविद्यालये, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

दिपक वसावे
उपकुलसचिव
विशेष कक्ष

स्थळ: - मुंबई
दिनांक: 28 ऑक्टोबर, २००८.

(सोबत सामान्य प्रशासन विभागाच्या, "अपंग कर्मचाऱ्यांना गट क व गट ड पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या 3% आरक्षणाच्या अमंलबजावणीबाबत.", या विषयाबाबतच्या शासन परिपत्रक क्रमांक:- अपंग १००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ, दिनांक ८ सप्टेंबर, २००८ ची प्रत)

## महाराष्ट्र शासन

क्रमांक:- साकिर्ण २००८/प्र.क्र.१७०/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मंबई - ४०० ०३२
दिनांक:- २२ सप्टेंबर, २००८

प्रति,

१. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व संचालक
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, मुंबई

यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सही/-
(प्र. ल. दराडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

अपंग कर्मचाऱ्यांना गट क व गट ड पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या ३% आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक, क्रमांक: अपंग-१००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ८ सप्टेंबर, २००८.

वाचा:- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र-एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६अ,दि.२.५.१९९८.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र-एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६अ,दि.५.३.२००२.
३) केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरंडम, क्र.-३६०३५/३/२००४/Esit (Res), दि. २१.१२.२००५.
४) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.अपंग २००२/प्र.क्र.३३१/सुधार ३,दि.७.६.२००६.
५) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.अपंग २००७/प्र.क्र.६१/सुधार ३, दिनांक २०.४.२००७.
६) शासन शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.अपंग २००७/प्र.क्र.६१/सुधार-३ दिनांक २५.५.२००७.
७) शासन परिपत्रक, क्र.न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र.१०३/१६अ, दिनांक १९.१०.२००७.

प्रस्तावना:- अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५, १९९६ चा
१) हा अधिनियम जम्मू व काश्मिर राज्य वगळता, संपूर्ण देशामध्ये दि. ७ फेब्रुवारी, १९९६ पासून लागू करण्यात आला आहे.

२) संदर्भाधिन दि. २.५.१९९८ च्या परिपत्रकासोबतच अधिनियमातील ३२ आणि ३३ चे उतारे जोडून सर्व नियुक्ती अधिकाऱ्याना पाठविले आहे. त्यानुसार अधिनियमाच्या कलम ३२ नुसार राज्य शासनाने अपंगासाठी आपल्या आस्थापनेवरील जी पदे आरक्षित करता येतील ती पदे शोधून काढून निश्चित करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३३ नुसार अपंगाने नियुक्तीसाठी किमान ३ टक्के पदे आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रत्येकी एक टक्का पदे अनुक्रमे १) अंध/अल्पदृष्टी २) बहिरेपणा ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. या कलमात विशिष्ट कामाचे स्वरुप पहाता ज्या आस्थापनेवर अपंगासाठी आरक्षण करणे शक्य नाही, अशा बाबतीत सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३) संदर्भाधीन दि. ५.३.२००२ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील गट "क" व गट "ड" मधील अंध/ अल्पदृष्टी, कर्णबधिर, अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १ टक्का या प्रमाणे एकूण ३ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. पदोन्नतीमधील हे आरक्षण गट "क" मधून गट "क" पदावर, गट "ड" मधून गट "ड" पदावर आणि गट "ड" मधून गट "क" पदावर अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरिता असेल व अपंग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी विहित केलेले पदोन्नतीसंबंधातील नियम, आदेश व निकष (उदा. पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल इ.) यानुसार कार्यवाही करण्याचाही आदेश दिलेले आहेत.

४)	सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या पत्र  क्रमांक-अपंग२००२/प्र.क्र.३७१ सुधार-३ दिनांक ५.५.२००६ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.

१)	अपंगासाठी आरक्षित पदे भरण्यासाठी तसेच अपंगाचा अनुशेष मोजताना अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ अमंलात आल्यानंतर निर्माण झालेली रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत.

२)	वरील प्रयोजनार्थ केंद्र शासनाच्या दि. २९.१२.२००५ च्या परिपत्राकामध्ये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना

सदर सूचना करण्यात आणण्यासाठी वरील दि. २९.१२.२००५ च्या परिपत्राकाची प्रत वरील दि.५.५.२००६ च्या पत्रासोबत जोडली होती व सदर पत्रातील सूचना प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालये, महामंडळे व संस्थांना निर्गमित कराव्यात असे कळविले होते.

५)	<u>अपंगांना पदोन्नती देण्याची कार्यवाही होण्यासाठी सदर सूचना पुन्हा खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत</u>:-

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

अपंग **कर्मचाऱ्यांना** गट "क" आणि गट "ड" मधील पदांवर पदोन्नती देण्यासाठी अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) हा अधिनियम लागू झाल्यापासून म्हणजे दि. ७.२.१९९६ पासून रिक्त होणारी पदे विचारात घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना पुन्हा देण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०९०८११३०२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(दि. रा. डिंगळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन